जा.क्र.पोउआ/वि.शा.-१/ ८५६२/२०१७
पोलीस उप आयुक्त,विशा-१, पुणे शहर,
यांचे कार्यालय, दि.१५/०९/२०१७

<u>विषय</u> :- **फौजदारी प्रक्रिया संहिता सन-१९७३ चे कलम १४४ प्रमाणे प्रतिबंधकआदेश.**

**<u>आदेश,</u>**

लोहगाव टेक्नीकल विमानतळ व नागरी विमानतळ, पुणे शहर येथे दिवसा व रात्रौ वेगवेगळ्या एअर लाईन्सची व भारतीय वायु सेनेचे विमाने व हेलिकॉप्टर उतरत असतात व उड्डाण करीत असतात. रात्रीचे वेळी वैमानिकांना दिशा व ठिकाण दाखविण्यासाठी रनवे वर व एटीसी टॉवरकडून संकेतासाठी लाईटचा उपयोग करण्यात येतो.

ज्याअर्थी भारतीय वायुसेनांनी असे निदर्शनास आणुन दिले आहे की, लोहगाव विमानतळाचे वायुक्षेत्र (Air Field) जवळच्या परिसरात विविध कार्यक्रमाच्या वेळेस आकाशामध्ये प्रखर प्रकाश बीम (Light Beam) चा उपयोग करण्यात येतो.

माझी अशी खात्री पटली आहे की, अशा प्रखर लाईट बीममुळे वैमानिकाचे डोळे दिपून दुर्घटना होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग-१, मध्य उप-विभाग यांचेकडील अधिसुचना क्र.३ मधील पान क्र.४ मधील क्रिमिनल प्रोसिजर कोड नं.१९७३ चा क्र.एमएससी. १२७४/व्ही-एफ मधील आदेशाने सीआरपीसी १९७३ (II-१९७४) चे कलम २१ अन्वये विशेष पोलीस महानिरीक्षक यांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून नियुक्त करुन कलम १४४ चे विशेष अधिकार प्रदान केलेले आहेत.

त्याअर्थी मी **रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर**, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारान्वये असा आदेश देतो की,

लोहगाव वायुसेना व नागरी विमानतळाच्या साधारणपणे १५ कि.मी. अंतराच्या वायुक्षेत्र (Air Field) परिघामध्ये (Radius) पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात १८.०० ते ०६.०० वा. पर्यंत खालील कृत्यांवर प्रतिबंध करण्यात येत आहे.

कोणत्याही माणसाने किंवा कार्यक्रम आयोजकांनी प्रखर लाईट बीम आकाशात सोडू नये.

सदरचा आदेश **दि. १६/०९/२०१७** रोजी पासून दोन महिन्यासाठी अंमलात राहील.

सदरच्या आदेशांचे उल्लंघन करणारी व्यक्ती भादवि कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश मी, माझ्या सहीनिशी आज दिनांक १५ /०९/२०१७ रोजी दिला आहे.